## प्रकरण पाचवे

## उपसंहार

# प्रकरण पाचवे

## उपसंहार

प्रस्तुत लघुप्रबंधात शंकर पाटलांच्या कथेतील ग्रामीणतेचे स्वरुप तपासून पहाण्याचा प्रयत्न केला आहे. त्यासाठी प्रथम ग्रामीण साहित्य म्हणजे काय व साहित्यामध्ये ग्रामीणता कोणत्या प्रकारे प्रकट होत असते याचे विवेचन पहिल्या प्रकरणात केले आहे. हे विवेचन करताना ग्रामीण संवेदनशीलता या संकल्पनेचा उपयोग करुन ग्रामीण जीवनाचे चित्रण शहरी जीवनाच्या चित्रणाहून वेगळे कसे असते ~~ह~~ ते पाहिले. खेडेगावामध्ये जे जे वैशिष्टयपूर्णतेने असते ते ग्रामीण. खेडेगावातील शेती-व्यवसाय, तेथील समाज रचना, जातिसंस्थेची वैशिष्टये, कुटुंबपध्दती धर्म, परंपरा, यांचे ग्रामीण जीवनात असलेले स्थान, तेथील भाषा या सर्व घटकांनी वैशिष्टयपूर्ण अशी ग्रामीणता सिध्द झालेली असते. ग्रामीण जीवनावर कथा लिहिणाऱ्या लेखकाकडून ह्या ग्रामीणतेचा आविष्कार अपरिहार्यपणे होत असतो. लेखकाकडून होणारा ग्रामीणतेचा आविष्कार किती विविध अंगांनी युक्त, समृध्द व खोलवरचा आहे याचा त्याच्या लेखन कृतीच्या गुणवत्तेशीही संबंध पोहचत असतो, अशी भूमिका मांडली. या दृष्टीनेच शंकर पाटलांच्या कथांचा विचार आपण पुढील प्रकरणात करणार आहोत.

शंकर पाटील हे प्राधान्याने कुटुंबामधील व्यक्तींच्या मनावरील ताणाचे चित्रण आपल्या कथांमध्ये करतात हे त्यांचे वैशिष्टय ध्यानात घेऊन दुसऱ्या प्रकरणामध्ये त्यांच्या कथांमधून ग्रामीणतेचा आविष्कार कोणत्या प्रकारे होतो याचे विवेचन केले आहे. ग्रामीण माणसांच्या मनावरील ताणांचे चित्रण करणे हे त्यांच्या कथा लेखनाचे वैशिष्टय आहे.

त्यांच्या कथांतील माणसे ग्रामीण संस्कृतीने घडविलेली व ग्रामीण सामाजिक वास्तवात व्यवहार करणारी आहेत. मात्र पाटलांचा सारा भर व्यक्तिमनावरील ताणांचे चित्रण करण्यावर असल्याने ग्रामजीवनातील सामाजिक वास्तवाला ते चित्रण-विषय करीत नाहीत. तर व्यक्तिमनाचे चित्रण करीत असताना अपरिहार्यपणे ग्रामीणतेची वैशिष्टये त्यांच्या कथांमध्ये चित्रित होतात. मात्र ही वैशिष्टये केंद्रस्थानी न येता पार्श्वभूमी म्हणूनच येतात.

शंकर पाटील ज्या व्यक्तींच्या जीवनाचे चित्रण करतात; त्या ग्रामीण कुटुंबातीलच असतात. म्हणून त्यांची कथा व्यक्तिकथेबरोबरच कुटुंबकथाही बनते. त्यांनी चित्रित केलेले कौटुंबिक जीवन हे ग्रामीण परिसरातील पारंपारिक एकत्र कुटुंबव्यवस्था असलेल्या माणसांचे जीवन असते. त्या कुटुंबात वाढलेली, विशिष्ट ग्रामीण संस्कारांनी घडलेली माणसांची मने पाटलांच्या कथांतून व्यक्त होतात. त्यांच्या कथांतून जो काही ग्रामीणतेचा आविष्कार होतो तो कुटुंबातील व्यक्तींच्या परस्पर संबंधातून होतो.

पाटलांच्या कथांतून एकत्र कुटुंबपध्दतीचे चित्रण येते. ही कुटुंबपध्दती पुरुषसत्ताक आहे. पती व पत्नी ही दोघेही संसाराची जबाबदारी प्राप्त परिस्थितीनुसार पार पाडण्यासाठी झटतात. पतिपत्नीसंबंध सामान्यत: प्रेमाचे असले तरी त्यामध्येही विविधता आढळते. ग्रामीण कुटुंब व्यवस्था श्रेष्ठ कनिष्ठ भावावर आधारलेली असल्याने कुटुंबातील कर्त्या पुरुषाचे, नवऱ्याचे, सासूचे, थोरल्या दिराचे, थोरल्या भावजयाचे त्यानुसार स्थान ठरते. वडील – मुलगा, आई – मुलगा आई – मुलगी, भाऊ – भाऊ, बहीण – भाऊ, वडील – मुलगी, चुलता – पुतण्या, सासू – सुना, नणंद – भावजय, या नात्यातील संबंधाचे प्रत्ययकारी चित्र शंकर पाटील रेखाटतात. नात्यानात्यातील संबंधात

व्यक्तिवैशिष्ट्याने येणारी विविधता पाटील चित्रित करतात. मात्र ह्या संबंधांच्या पाठीमागे ग्रामीण समाज रचनेची वैशिष्टये असतातच.

कुटुंबातील अनेकविध व्यक्तींत अंतर्गत ताणतणाव असले तरी सर्वांनी एकत्र राहून जीवन जगले पाहिजे ही भावना व जाणीव निर्माण झालेली असते. ग्रामीणतेच्या ह्या वैशिष्टयांचे चित्रण पाटलांच्या कुटुंबकथांतून स्वाभाविकपणे तसेच प्रत्ययकारी रीतीने होताना आढळते.

पाटलांच्या कथांत आढळणारे प्रमुख वैशिष्टय म्हणजे त्यांच्या कथांचा विषय कोणाच्यातरी मनावरील ताणांचे चित्रण करणे हा असतो. ज्यांच्या मनावरील ताणांचे चित्रण केले आहे ती माणसे ग्रामीण परिस्थितीत वाढलेली, ग्रामीण संस्कार मनावर घडलेली असतात. त्यांच्या मनावरील ताणांची कारणे ही ग्रामीण परिस्थितीने निर्माण केलेली असतात. ग्रामीण कुटुंबातील व्यक्तिव्यक्तीचे परस्पर संबंध पाटलांच्या कथांत चित्रित होतात. वरील दोन्ही गोष्टींचे विवेचन दुसऱ्या प्रकरणात केले. शंकर पाटलांचा सगळा भर व्यक्तिमनावरील ताणांचे चित्रित करण्यावर असल्याने ग्रामजीवनावरील सामाजिक वास्तवाला ते चित्रणविषय करीत नाहीत.

कौटुंबिक नात्यामधून ग्रामीणता कशी प्रकट होते हे दुसऱ्या प्रकरणात पाहिल्यानंतर तिसऱ्या प्रकरणात, अन्य प्रकारच्या ग्रामीणतेचा आविष्कार पाटलांच्या कथांमधून कितपत व कोणत्या प्रकारे होतो याचे विवेचन केले आहे. खेडेगावातील सामाजिकता ही तेथील दारिद्र्य, जातीय तणाव, भाऊबंदकी, अंधश्रध्दा, संकेत, शेतीव्यवसाय, बलुतेदार-शेतकरी संबंध यांमधून दिसून येत असते. तेव्हा या सगळ्यांचे चित्रण येणे म्हणजे ग्रामीणतेचा आविष्कार होणे; अशा प्रकारचा प्रत्यय व्यंकटेश माड-

गूळकरांच्या कथांतून जितका येतो तितका पाटलांच्या कथांतून येत नाही. कुटुंबचित्रणा व्यतिरिक्त फार थोड्या प्रमाणात इतर अंगांनी त्यांच्या कथांतून ग्रामीणतेचा आविष्कार ~~[illegible]~~ होतो दारिद्र्य, अंधश्रद्धा, शेतीव्यवसाय यांचे चित्रण केवळ पार्श्वभूमी म्हणूनच येते. पाटलांचा मुख्य रोख असतो तो ग्रामीण मनाचे चित्रण करण्याकडेच.

ग्रामीण जीवनातील शेती हाच प्रमुख व्यवसाय, तेथील माणसांच्या जगण्याचे साधन असतो. पण या व्यवसायाचे ते सामाजिकतेच्या दृष्टीने चित्रण न करता ऊन, पाऊस, भरून आलेले आभाळ, डोलणारे शेत या सर्वांचा उपयोग ते मानवी मनाचे प्रतिबिंब स्पष्ट करण्यासाठी, मनातील घालमेल व्यक्त करण्यासाठी करतात. तसेच अंधश्रद्धा, कुलाभिमान, दारिद्र्य या गोष्टींचाही उल्लेख ते मनावरील ताणांचे चित्रण करण्यासाठीच करतात. या व्यतिरिक्त खेडेगावातील समाजात असणारे जातीय तणाव आणि त्यातून ठरणारी व्यक्तींची श्रेष्ठकनिष्ठता यांचे पाटलांच्या कथांत चित्रण येत नाही. तसेच भाऊबंदकी, बलुतेदार शेतकरी संबंध यांतून व्यक्त होणारी ग्रामीणता ही आपणाला पाटलांच्या कथांत ग्रामीणतेचा आविष्कार विविध अंगांनी व प्रत्यक्षपणे फारसा होत नाही, असेच म्हणावे लागेल.

शेवटच्या चौथ्या प्रकरणात कथारचनेचे घटक आणि ग्रामीणतेचे चित्रण या विषयी विवेचन केले आहे. कथेच्या घटकांपैकी कथानक, व्यक्तिचित्रण, संवाद, व भाषा या चारही घटकांचा ते प्रभावीपणे वापर करतात. मात्र ग्रामीण मनाची वैशिष्ट्ये व त्यावरील ताण परिणामकारकरीतीने प्रकट करण्यासाठीच ह्या घटकांचा ते उपयोग करतात. पाटलांना आपल्या कथानकातून ग्रामीणतेचे चित्रण करणे अभिप्रेत नसते; तर सामान्यतः कौटुंबिक संबंधातून किंवा अन्य प्रकारे निर्माण होणाऱ्या ताणांचे

चित्रण करणे अभिप्रेत असते. म्हणून त्यांच्या कथेचे कथानक कार्यकारण-भावयुक्त व पर्यवसान दाखविणारे नसते. तर ते घटनाप्रधान व मना-वरील ताणाला कारणीभूत ठरणारे असते. मनावरील ताणांचे चित्रण करणे या त्यांच्या लेखनाच्या उद्दिष्टानुसारच त्यांच्या कथानकाची रचना होत असते.

पाटलांना व्यक्तीमध्ये आस्था आहे ती तिच्या मनाच्या हालचाली टिपण्यात. ही व्यक्ती एक समाजातील व्यक्ती आहे. अशा प्रकारचे चित्रण करण्यात त्यांना स्वारस्य नाही. व्यक्तीच्या मनावर विशिष्ट परिस्थितीत कोणत्या स्वरूपाचा ताण निर्माण होतो; व तिचे स्वभावविशेष कसे प्रकट होतात हे त्यांना दाखवायचे असते. या दृष्टीनेच त्यांनी आपल्या कथांतील व्यक्तीचे चित्रण केलेले आढळते.

म्हणून संवादांचा उपयोगही समाजात काय घडते हे सांगण्यासाठी नाही; पण मनावरचा ताण प्रकट करण्यासाठीच ते करतात. घटनेचा तपशील पुढे नेण्याकडे त्यांच्या संवादांचा रोख नसून मनावरील ताण चित्रित करण्याकडेच असतो. त्यांच्या कथालेखनाचा उद्देश व्यक्तिमनाचे चित्रण करणे हा असल्याने स्वाभाविकपणेच संवादाचा उपयोगही ते त्याच उद्देशाने करतात.

पाटलांच्या कथेतील भाषा हा घटक मात्र ग्रामीणत्वाचा उत्कट-त्वाने व निखळ प्रत्यय देणारा घटक आहे. ग्रामीण मने जिवंतपणे चित्रित करण्याचे सामर्थ्य त्यांच्या भाषेत आहे.

वरील सर्व विवेचनावरून आपणाला असे म्हणता येईल की, कथानकरचना, व्यक्तिचित्रण, संवाद आणि भाषा हे त्यांच्या कथारच-नेचे घटक ते मनावरच्या ताणांचे चित्रण करण्यासाठी उत्तमप्रकारे उपयोगात

आणतात. मनावरील ताणांचा प्रत्यय देणारी व एकात्म स्वरूपाचा संस्कार साधणारी त्यांची कथा परिणामकारक तशीच कलात्मक ठरते. मात्र त्यांच्या कथेत ग्रामीणतेच्या इतर अंगांचा प्रत्यय येत नाही. पाटलांच्या कथारचनेच्या घटकांपैकी त्यांची भाषा तेवढी ग्रामीणतेचा सरळ व उत्तम प्रत्यय देते. इतर वैशिष्ट्यांच्या द्वारा ग्रामीणतेचे व्यापक स्वरूपात चित्रण करणे हे त्यांचे उद्दिष्टच नव्हे. आणि त्या प्रकारचा परिणाम ते या तांत्रिक वैशिष्ट्यांच्या द्वारा साधतही नाहीत.

शंकर पाटील यांची कथा कलागुणाच्या दृष्टीने चांगली आहे. मात्र ग्रामीणतेची सगळी वैशिष्ट्ये सामावून घेण्याइतका तिचा आवाका मोठा नाही; व पाटलांच्या कथेला ते अभिप्रेतही नाही. तिच्या चांगलेपणाचे वैशिष्ट्य कथेला अभिप्रेत असलेला एकात्म स्वरूपाचा संस्कार करण्यातच आहे. ग्रामीणतेचा प्रत्यय त्यांची कथा अप्रत्यक्षपणेच देते. मात्र वाचकांच्या मनावर एकात्म स्वरूपाचा संस्कार प्रभावीपणे करू शकणारी त्यांची कथा कलादृष्ट्या चांगली वाटते.

. . .

## संदर्भसूची

### ग्रंथसूची

१) यादव आनंद, ग्रामीण साहित्य स्वरूप आणि समस्या, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, १९७९.

२) ---------, मातीतलं मोती, ललित साहित्य प्रकाशन, पुणे, १९७०

३) ---------, ग्रामीणता : साहित्य आणि वास्तव, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, १९८१.

४) अंबादास माडगूळकर, खांडेकर सूर्यकांत (संपा), मराठी ग्रामीण कथा, कोकव प्रकाशन, पुणे, १९६७.

५) कुलकर्णी वा.ल; निवडक शंकर पाटील, नवमहाराष्ट्र प्रकाशन, पुणे, १९६६.

६) पाटील शंकर, वळीव, मौज प्रकाशन, मुंबई, १९५८.

७) ---------, ऊन, इंद्रायणी साहित्य प्रकाशन, पुणे, १९६३.

८) ---------, शारकथा, इंद्रायणी साहित्य प्रकाशन, पुणे, १९८२.

९) फडके भालचंद्र (संपा), सहा कथाकार, कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे, १९७५.

१०) माडगूळकर व्यंकटेश, माणदेशी माणसे, कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे, १९६२.

११) ---------, उंबरठा, २ री आ, उत्कर्ष प्रकाशन, पुणे, १९८२.

१२) ---------, गावाकडच्या गोष्टी, ३ री आ., उत्कर्ष प्रकाशन, पुणे १९८२.

१३) कुलकर्णी दा.वि., मराठी कथा स्वरूप आणि आस्वाद, स्वाध्याय प्रकाशन, पुणे, १९७६.

१४) प्रदक्षिणा, ७ आ., कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे, १९८०.

नियतकालिके


१) महाराष्ट्र साहित्य पत्रिका, जुलै - डिसें, १९८०.

२) दै. सकाळ, १-८-८१.

३) प्रतिष्ठान, मे १९६८.


---